# कायदा सर्वांना - एकाच वेळी समान

महाराष्ट्र राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था म्हणजे सर्व प्रकारच्या पतसंस्थांसाठी महाराष्ट्र सरकारने कायदा प्रस्तावित केल्याचे निदर्शनास आलेले आहे. संपुर्ण देशातील सहकार क्षेत्राला मार्गदर्शक ठरतील अशा कायद्यातील सुधारणा प्रस्तावित असल्याचे संबंधीतांचे म्हणणे आहे. केंद्र शासनाच्या कृषी व सहकार विभागाने प्रस्तावित १११ व्या घटना दुरूस्तीने सुचविलेल्या तरतुदीला अधिन राहून महाराष्ट्रातील पतसंस्थांसाठी कायद्यात सुधारणा केल्याचे ऐकविले जात आहे. सध्याच्या सहकार कायद्यातील प्रकरण ४ नंतर नवीन प्रकरणाचा समावेश करून सध्याच्या कलम ४९ नंतर ४९ - अ, ४९ - ब, ४९ - क, व ४९ - ड या नवीन कलमांतर्गत बदल सुचविलेले बोलले जात आहे. हे बदल सुचवित असताना संबंधित समितीने पतसंस्थांचा कारभार गुणात्मक होण्यासाठी पावले उचलल्याचे म्हटले आहे. **परंतु समितीने सुचविलेल्या मसुद्याचे संपुर्ण राज्यभर संबंधितांच्या सभा घेऊन वाचन केले हे म्हणणे धातांत खोटे आहे.** राज्य बँक / जिल्हा बँका / राज्यातील तालुका / जिल्हा / विभाग व राज्यस्तरावरील पतसंस्थांचे फेडरेशन्स यांना या संदर्भात काहीही कळविलेले नाही व त्यामुळे संबंधितांच्या सभा घेण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. वास्तविक एखादी गोष्ट चांगली करण्याचा हेतू असेल व तो कायद्यांतर्गत असेल तर सुचविलेला मसुदा कायद्यामध्ये रूपांतरीत करण्याच्या अगोदरच जनतेची फसवणूक केल्याचे म्हणजेच राज्यभर सभा घेऊन मसुद्याचे वाचन केल्याचे खोटे चित्र उभे केलेले आहे. म्हणून सदरहू मसुदा कायदात अंतर्भूत करण्याच्या अगोदरच राज्य सरकारने / समितीने सुचविलेल्या मसुद्याचे वर्तमान पत्रांमध्ये वरीलप्रमाणे जिल्हा बँक / राज्य बँक व पतसंस्था फेडरेशन्सना मसुदा पाठविणे आवश्यक आहे. व किमान २ महिने हा मसुदा संबंधितांना प्राप्त झाल्यानंतर या विषयाच्या रितसर विभागाप्रमाणे सभा, सभेच्या तारखा, ठिकाण व वेळ संबंधितांना लेखी / प्रत्यक्ष कळवून वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देवून तमाम जनतेच्या सुनावनीसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे. अन्यथा पतसंस्थांसाठीचा प्रस्तावित कायदा हा सहकार क्षेत्राला घातक ठरल्याशिवाय राहणार नाही. व याचा दुरगामी परिणाम देशाच्या संविधानावर होतील.

प्रामुख्याने पतसंस्थांमधील ठेवी व कर्ज वसुली ह्यावर आधारित नवीन प्रस्तावित कायद्याचे मुळ आहे. आणि यासाठी समानता सोडून कुठलाही कायदा राज्य सरकार कायद्यात अंतर्भाव करू शकत नाही. ठेवी स्विकारण्याचे व त्यावर कालावधी नमूद करुन व्याज देण्याचे कामकाज राज्यात पतसंस्थांबरोबर साखर कारखाने देखील करतात. आणि राज्यातील २०० च्यावर असलेले साखर कारखाने यांनी सभासद व बिगर सभासदांकडून ज्या ठेवी कायदेशीर व बेकायदेशीर मार्गाने स्विकारलेल्या आहेत त्या ठेवी व त्यावरील व्याजाची रक्कम ५ हजार कोटी रुपयांच्यावर साखर कारखानदारांनी ठेवीदार शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे दिलेल्या नाहीत. आणि अशा वेळेस पतसंस्थांसाठी ठेवीच्या संदर्भात कायदा घाईघाईने लागू करणे व त्याच ठेवीच्या कारणांसाठी साखर कारखान्यांना मात्र हा कायदा लागू न करणे हा **देशद्रोही प्रवृत्तीच्या दिशेने उचललेल्या पावलाची सुरुवात आहे असा जर कोणी निष्कर्ष काढला तर याची फार मोठी किंमत राज्य सरकारला मोजावी लागेल.**

पतसंस्थांमधून ठेवी मिळाल्या नाही म्हणून पतसंस्थांमधील अनेक संचालकांना / पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्र सरकारने जेलमध्ये डांबले आहे. परंतु पतसंस्थांपेक्षा कितीतरी पटीने हजारो कोटी रुपये ज्या साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ठेवी व ठेवींवरील व्याज दिलेच नाही. अशा साखर कारखान्यांवर मात्र काहीही

कारवाई केलेली नाही. व साखर कारखान्यांचा एकही संचालक ठेवी परत न करण्याच्या कारणास्तव जेलमध्ये टाकण्याचे घटनेप्रमाणे काम महाराष्ट्र सरकारने केलेले नाही. ही कायद्यातील विषमता आहे. आणि अशी विषमता ठेवून केवळ पतसंस्थांसाठी कायद्यात बदल करुन सहकार क्षेत्राला मार्गदर्शक ठरणारा कायद्याचे ढोंगाचा पर्दाफाश होणार आहे.

कायदा हातात घेऊन तत्कालीन सहकार आयुक्त मा. रत्नाकर गायकवाड व उमेशचंद्र सरंगी यांनी ‘ पतसंस्था डिपॉझिट गॅरेंटी कार्पोरेशन ’ नोंदणी करून दिले. कायदा हातात घेऊन नोंदणी केली व रिझर्व्ह बॅंक, नाबार्ड, महाराष्ट्र शासन, केंद्र शासन व ईर्दा यांची परवानगी न घेता जवळ जवळ १ २५ कोटी रुपये पतसंस्थांकडून जबरदस्तीने जमा केले व या रकमा जमा करण्याच्या व नोंदणी प्रस्तावावर या दोघांनी त्या त्या वेळी मंजुरी देऊन भारताचे संविधान त्याचवेळी पायदळी तुडविले. व पतसंस्थांच्या करोडो रुपयांच्या ठेवी व त्यावरील व्याजाचे कायमचे नुकसान केले. परंतु या दोन्ही आय.ए.एस्. अधिकाऱ्यांवर केंद्र व राज्य सरकारने काहीही कारवाई केलेली नाही. किंबहुना हे दोघेही मा. रत्नाकर गायकवाड एम्.एम्.आर.डी. चे आयुक्त व उमेशचंद्र सारंगी नाबार्डचे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत.

थोडक्यात या देशात कुठलाही कायदा सर्वांना एकाचवेळी व समान लागू असतो हे जाणीवपूर्वक संबंधित मंडळी विसरलेले आहेत. आणि याचा उलगडा व चौकशी भविष्यात होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा सरकार संविधान सोईनुसार वापरते. व ही कृती सर्वश्रृत व सर्वमान्य झाली तर बेदलीला सामोरे जावे लागेल हे सुचक परिस्थितीचे विचार या निमित्ताने मांडीत आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!